# सहसंचालक तंत्रशिक्षण, अमरावती

शासकीय तंत्रनिकेतन परिसर, गाडगेनगर, अमरावती

दूरध्वनी : ०७२१ २५७३०२७ (कार्या.)
०७२१ २५७२५७७

संकेतस्थळ : www.jdroamt.org
ई-मेल : roamravati@dtemaharashtra.gov.in

---

जा.क्र. विकाअ/लले/इंडमिट./२०१८/ 820 दि. २७.३.२०१८

**परिपत्रक**

तंत्रशिक्षण संस्था आणि स्थानिक उद्योगक्षेत्र हयामध्ये समन्वय साधने आणि त्याद्वारे अभियंता विद्यार्थ्यांस औद्योगिक जगताच्या अनुरूप घडविणे आणि भविष्यातील तंत्रज्ञान आत्मसात करुन त्यांची रोजगारसिध्दता वाढविणे ही आजची गरज झाली आहे. त्यादृष्टीने अमरावती विभागातील तंत्रशिक्षण संस्था आणि औद्योगिक क्षेत्रातील तज्ञांना एका व्यासपीटावर आणणे, चर्चा घडविणे, समन्वय साधणे इत्यादिकरीता दि. ९.४.२०१८ (सोमवार) रोजी हॉटेल रंगोली पर्ल, नवाथे चौक, बडनेरा रोड, अमरावती येथे अमरावती विभागीय स्तरावर इंडस्ट्रीयल मिट (Industrial Meet) आयोजित करण्यात येत आहे.

सदर कार्यक्रमात विदर्भ इंडस्ट्रीज असोशिएशनचे अध्यक्ष, पदाधिकारी व उद्योजक सहभागी होत आहेत.

सदर कार्यक्रमास सर्व शासकीय, अनुदानित व विनाअनुदानित (पदवी व पदविका) अभियांत्रिकी महाविद्यालये, औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालये आणि तंत्रनिकेतनांचे प्राचार्य आणि प्रशिक्षण व आस्थापना अधिकारी हयांनी व्यक्तीशः अवश्य उपस्थित रहावे. अत्यंत अपवादात्मक परिस्थितीतच प्रतिनिधी पाठवावेत.

सदर कार्यक्रमास आपले जिल्हयातील उद्योगसंस्थांचे प्रतिनिधी हयांना आपण आमंत्रित करावे व त्याबाबतची आगाऊ सूचना पुढील इ-मेल आयडी वर कालमर्यादेत पाठवावी.

mmd101@gmail.com manojthakare.2007@rediffmail.com

सदर कार्यक्रमाचे नोंदणी शुल्क रु. २०००/- प्रति संस्था असेल व कार्यक्रमस्थळी नोंदणी करतांना रोखीने द्यावे. कार्यक्रमाची रुपरेषा खालील प्रमाणे आहे :

| वेळ | तपशिल |
|---|---|
| सकाळी १०.०० ते ११.०० | नोंदणी व नास्ता |
| दुपारी ११.०० ते १.०० | १ उद्योजक व शिक्षण क्षेत्रातील प्रतिनिधींचे सादरीकरण<br>२ पॅनेल डिस्कशन<br>३ प्रश्नोत्तरे |
| दुपारी १.०० ते २.०० | सह-भोजन |

(डॉ डी व्ही जाधव)
सहसंचालक तंत्रशिक्षण, वि.का.,अमरावती

प्रतिलिपी :

प्राचार्य, शासकीय/अनुदानित/विनाअनुदानित अभियांत्रिकी/औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालये व तंत्रनिकेतने, अमरावती विभाग.